# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी
# पोस्टः - शिरडी - ४२३ १०९, ता.राहाता, जि. अहमदनगर

फोन नं.-०२४२३-२५८५००, फॅक्स नं.-०२४२३-२५८८७०
website: - http://www.shrisaibabasansthan.org

## कोटेशन सुचना

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांचे **"श्री रामनवमी उत्सव-२०१८" करीता विद्युत रोषणाईचे साहित्य व देखाव्याचे साहित्य मुंबई येथून (वेगवेगळया ठिकाणाहून ) आणणे व पुन्हा (वेगवेगळया ठिकाणी ) पोहच करणेकामी भाडोत्री ट्रक्स** पुरविणकामी दरपत्रके मागविण्यात येत आहे.

---

**विषय :- "श्री रामनवमी उत्सव-२०१८" करीता विद्युत रोषणाईचे साहित्य व देखाव्याचे साहित्य मुंबई (वेगवेगळया ठिकाणाहून ) येथून आणणे व पुन्हा (वेगवेगळया ठिकाणी ) पोहच करणेकामी भाडोत्री ट्रक्स पुरविणेबाबत**

"श्री रामनवमी उत्सव-२०१८" साजरा करण्यात येणार असल्याने मुंबई येथून श्री.द्वारकामाई मंडळ,मुंबई यांचे विद्युत रोषणाईचे साहित्य व देखाव्या साहित्य वेगवेगळया ठिकाणाहुन शिर्डी येथे आणणे व उत्सव संपलेनंतर पुन्हा शिर्डी येथून मुंबई येथे वेगवेगळया ठिकाणी पोहोच करणेकामी भाडोत्री तत्त्वावर ट्रक्स (हूड असलेल्या एल.पी.ट्रक्स ) पुरविणेकामी कोटेशन मागविण्यात येत आहे. तपशील खालीप्रमाणे.:-

| अ.क्र. | कामाचा तपशील | भाडोत्री ट्रक्सची एकुण संख्या | अंदाजे मटेरियल आणणे व पोहच करणेची तारीख (वाहतुकीचा कालावधी) | ट्रक्सची संख्या | साहित्य आणणे व पोहच करणेचे मुंबईतील ठिकाण | प्रती भाडोत्री ट्रकचे (जाणे-येणे) भाडे (जी.एस.टी. करासहीत) | एकुण होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | "श्री रामनवमी उत्सव-२०१८"करीता मुंबई येथून श्री.द्वारकामाई मंडळ,मुंबई यांचे विद्युत रोषणाईचे साहित्य व देखाव्या साहित्य वेगवेगळया ठिकाणाहुन शिर्डी येथे आणणे व उत्सव संपलेनंतर पुन्हा शिर्डी येथून मुंबई येथे वेगवेगळया ठिकाणी पोहोच करणेकामी भाडोत्री तत्त्वावर ट्रक्स पुरविणे | **०८ नग (मॉडेल - १६१३) + ( ६ टायर हूड असलेल्या एल. पी. ट्रक्स)** | दि.१३ ते १४ मार्च (साहित्य आणणे)दि. ६ ते ८ एप्रिल (पोहच करणे) | **०३** | **गोरेगांव (वेस्ट)** | | |
| | | | दि.१५ ते १६ मार्च ( साहित्य आणणे)दि. ६ ते ८ एप्रिल (पोहच करणे) | **०१** | **मुरबाड + कल्याण** | | |
| | | | | **०२** | **जोगेश्वरी + अंधेरी** | | |
| | | | दि.१८ ते १९ मार्च (साहित्य आणणे) दि २७ एप्रिल (पोहच करणे) | **२** | **चिंचपोकळी + लालबाग + दादर** | | |
| | **एकुण रक्कम रु (जीएसटी करासह अंतर्भुत) :-** | | | | | | |

**अटी व शर्ती :-**

०१). संस्थानमार्फत कोणत्याही प्रकारचा इंधन खर्च , ड्रायव्हरचा पगार व भत्ता ,टोलकर,व इतर कर इत्यादीकरीता रक्कम, वरील रकमेव्यतिरीक्त वेगळी दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

०२). मटेरीअल आणण्यासाठी व पुन्हा पोहोच करण्यासाठी वरील तारखा व जागा दर्शविण्यात आलेल्या आहेत.परंतु परिस्थितीनुरुप त्यामध्ये बदल होऊ शकतो.

०३). मा.कोर्टाच्या आदेशानुसार ८ वर्षे व त्यापेक्षा जास्त कालावधी झालेल्या जड वाहनांना मुंबईत प्रवेश करण्यास बंदी घालण्यात आली आहे व या आदेशाची अंमलबजावणी मुंबईत चालू झालेली आहे.त्यामुळे ट्रक पाठवताना पोलीस नाक्यावर अथवा मुंबईत त्रास होणार नाही या गोष्टींचा विचार करुन शक्यतो अलीकडच्या काळात पासींग झालेल्याच ट्रक पाठवाव्या लागतील यांची नोंद घ्यावी.

०४). भाडोत्री ट्रक्स पुरवितांना त्या ट्रक्सची सर्व आवश्यक ती कागदपत्रे व इन्सुरन्सची जबाबदारी सर्वस्वी ट्रान्सपोर्ट मालकाची राहिल

०५).भाडोत्री ट्रक्सची संख्या कमी किंवा जास्त होऊ शकते यांची नोंद घ्यावी.

०६).भाडोत्री ट्रक्स पुरवितांना त्या ट्रकचा अपघात झाल्यास किंवा काही नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ट्रान्सपोर्ट मालकाची राहील यासाठी संस्थानमार्फत कोणती भरपाई दिली जाणार नाही.

०७). मटेरियल वाहतुक करतांना मटेरियलचे काही नुकसान झाल्यास त्याची भरपाई करुन देणेची सर्वस्वी जबाबदारी ट्रान्सपोर्ट मालकाची राहिल. संस्थानमार्फत कोणती भरपाई दिली जाणार नाही.

०८). काम पुर्ण झाल्याशिवाय कोणत्याही प्रकारचा ॲडव्हान्स कामाअगोदर दिला जाणार नाही किंवा अर्धवट वाहतूकीचे ( एकतर्फी वाहतूकीचे ) बील अदा केले जाणार नाही मटेरियल वाहतुकीचे ( दोन्ही साईडचे मटेरियल आणणे व पोहच करणे ) काम पुर्ण झालेनंतरच बीलाची रक्कम अदा करणेत येईल.

०९) वाहतूकीचे काम अर्धवट केल्यास त्या संपूर्ण फेरीच्या ( मुंबई ते शिर्डी व परत शिर्डी ते मुंबई ) रक्कम बीलातून वजा केली जाईल व त्याबद्दल कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

१०).वाहतूक करतेवेळी एखादा ट्रक फेल झाल्यास ( ट्रकमध्ये बिघाड झाल्यास ) तातडीने ४ तासाच्या आत दुसरा ट्रक त्या ठिकाणी ( ज्या ठिकाणी सामान भरलेला ट्रक बंद पडला त्या ठिकाणी ) उपलब्ध करून द्यावा लागेल व बिघाड झालेल्या ट्रकमधील सामान हमालांकडून दुसऱ्या ट्रकमधे भरून द्यावे लागेल. व या हमालीची रक्कम ट्रान्सपोर्टरने स्वतः आदा करावयाची आहे. त्याबदली वरील रकमेव्यतिरीक्त वेगळी संस्थानमार्फत दिली जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

तरी वरील सर्व अटी - शर्तीस अनुसरुन आपली कोटेशन मोहोरबंद पाकीटात , **"विद्युत विभाग "श्री रामनवमी उत्सव-२०१८" करीता विद्युत रोषणाईचे साहित्य व देखाव्याचे साहित्य मुंबई येथून (वेगवेगळया ठिकाणाहून ) आणणे व पुन्हा (वेगवेगळया ठिकाणी ) पोहच करणेकामी भाडोत्री ट्रक्स पुरविणे कामाकरीता कोटेशन "असे पाकीटावर स्पष्ट नमूद करुन,** सदर कोटेशन **दि.२४ /०२ /२०१८** रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडी येथील कार्यालयात त्वरीत पाठविण्याचे करावे. या दिनांकानंतर व वेळेनंतर आलेली कोटेशन्स ग्राह्य धरली जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

(श्रीमती रुबल अग्रवाल,भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडी